# ''तिळ-गूळ घ्या गोड गोड बोला''

ह्या महिन्यात ''मकर संक्रांत'' हा दिवस रविवार, दिनांक १४ ला आहे. ''मकर संक्रांत'' हा दिवस दरवर्षी ह्याच महिन्यात, ह्याच तारखेला येतो. आता, काहीजणांच्या मनात हा प्रश्न साहजिकच डोकावला असेल की, हा दिवस दरवर्षी ह्याच महिन्यात, ह्याच तारखेला का येतो व त्याला ''मकर संक्रांत'' का म्हणतात? तर, ह्या दिवशी सूर्य धन राशीतून मकर राशीत स्थलांतर करतो व ही अवस्था प्रत्येक वर्षी ह्याच महिन्यात, ह्याच तारखेला येत असते; म्हणून ह्या दिवसाला ''मकर संक्रांत'' म्हणून संबोधिले जाते.

परंपरेने चालत आले आहेत, म्हणून सण साजरे करायचे, असेच अनेकांकडून ऐकावयास मिळते. परंतु त्यामागे काही शास्त्रीय तसेच काही सामाजिक कारणे असतात. हवामानात झालेल्या बदलामुळे तिळ, गूळ आदीं सारखे प्रकृतीला पोषक असे पदार्थ सेवन करणे, हे जसे ह्या सणाविषयीचे शास्त्रीय कारण आहे, तसेच परस्परांच्या मनातील कलुषितपणा संपविण्यासाठी व एकमेकांबद्दल असलेला प्रेमभाव अधिक वृद्धिंगत करण्यासाठी हळदी-कुंकू लावणे, तिळ-गूळ वाटणे, हेही ह्या सणामागचे सामाजिक कारण आहे.

ह्या दिवसाच्या महत्त्वाबद्दल अशीही कथा सांगितली जाते की, संक्रांती देवीने उन्मत्त झालेल्या संक्रासूर ह्या राक्षसाचं ह्या दिवशी निर्दालन केलं व दुसऱ्या दिवशी, म्हणजे दिनांक १५ ला देवीने किंक्रासूर ह्या राक्षसाचा संहार केला, म्हणून हा दिवस किंक्रांत म्हणून ओळखला जातो. ही संक्रांती देवी प्रत्येक वर्षी भिन्न भिन्न वाहनांवरुन अवतीर्ण होते व तिची नजर ज्या ज्या वस्तूंवर पडते, त्या त्या वस्तू नाहीश्या होतात, असा एक समज आहे.

ह्या कथांना जरी फारसे महत्त्व नसले, तरी ह्या दिवसांना व ज्या पद्धतीने ते साजरे केले जातात, त्या पद्धतींना मात्र निश्चितच विशेष महत्त्व आहे. ह्या निमित्ताने एकमेकांना तिळगूळ देणे, महिलांनी एकमेकांना हळदी-कुंकवाला बोलावणे, यांमुळे परस्परांतील असलेला द्वेषभाव नष्ट होऊन सद्भावना निर्माण होते व असलेली सद्भावना द्विगुणीत होते.

एकमेकांबद्दल प्रेमभाव निर्माण करणारा व प्रेमभाव वृद्धिंगत करणारा हा सण केवळ एका विशिष्ट समाजापुरता मर्यादित न राहता त्याचं क्षेत्र व्यापक बनलं आहे, विस्तीर्ण झालं आहे.

## ग्रंथ परिचय

# सहज सुलभ श्री साई चाळीसा




"श्री साई चाळीसा" ही पॉकेट साईझ छोटीशी पुस्तिका श्री साईबाबा सत्संग मंडळाने नुकतीच प्रकाशित केली असून तिचे रचनाकार श्री. प्रभुलाल माणेकलाल दवे हे आहेत. ही पुस्तिका गुजराती भाषेत असून तिची काव्यात्मकता सोपी, सरळ व रसाळ आहे. तिची रचना हनुमान चाळीसा प्रमाणे आहे. यात श्री साई आरती, कपूर आरती, थाळ व श्री साईबाबांच्या अमूल्य अकरा वचनांचाही सामावेश करण्यात आला आहे. ही पुस्तिका आकाराने अगदी लहान असल्याने सदासर्वदा जवळ बाळगण्यास सहज, सुलभ अशी आहे.

पुस्तिकेचे नाव – श्री साई चाळीसा

पृष्ठे – २८



लेखक – श्री. प्रभुलाल माणेकलाल दवे

प्रकाशक – श्री साईबाबा सत्संग मंडळ (श्री साई मंदिर), चौटा बझार, नानी हींगपोळ, सुरत.

मुद्रक – मुद्रिका रामजीनी पोळ. नाणावट. सुरत.

मूल्य – ५० पैसे

# साईगीत

श्रद्धेतून भक्ती वाढवूया चला
भक्तीचा पूर नित्य वाहवूया चला
जीवनात असती जे रंगले सदा
साईशी त्यांस आज भेटवूया चला ॥१॥

साई हा ब्रह्म परम, परब्रह्मरूप
विश्वपित्या साईला भेटूया चला
मृण्मय ही असे पहा मानवी तनू
आकारा तिला आता आणूया चला ॥२॥

राग द्वेष मत्सर अन् दुष्ट भावना
क्रोध आणि लोभ आता हटवूया चला
मायेच्या जालातून काढूया जना
शिर्डीची महती त्या कळवूया चला
तेजरूप आत्मदेव दाखवू तया
साईमय ब्रह्म तया दाखवूया चला ॥३॥

- श्री. मोहन सोनवणे
साक्री, धुळे.

श्री साईबाबांच्या शुभाशीर्वादासह

# अनमोल दीप

पूर्वी ''श्री साईलीला'' मासिक अनुभवप्रधान होते; पण सध्या ''श्री साईलीला''चे रूप फारच बदलले आहे. अध्यात्माच्या वाटेवर ज्ञानाची प्रकाशकिरणे उजळत असून मानवाच्या अंत:करणातील ज्ञान ह्या प्रकाशाने प्रज्वलित होत आहे. श्री साईबाबा हे अध्यात्माचा जणू खजिनाच आहेत! ते तो खजिना संपादक, लेखक, कवी यांना प्रेरणा देऊन भक्तांना वाटत असतात. प्रथम संपादकीय लेख मी वाचतो; तो फारच सुंदर व अध्यात्माने परिपूर्ण असतो. रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला, श्री साईसत्चरिताचा ले. कर्नल श्री. मु. ब. निंबाळकर (निवृत्त) यांचा सुरू असलेला गद्य अनुवाद, संतांचे श्लोक, गीतेमधील पद्यात असलेले विचारधन, बालसाईभक्तांसाठी असलेली बोधपर लेखमाला, चिंतन हे सदर, असा हा श्री साईंचा अनमोल दीप आहे. त्याची प्रकाशकिरणे सदैव उजळत राहो, हीच श्री साईचरणी प्रार्थना.

**- श्री. न. वि. सरपोतदार**
पलूस, सांगली.

''श्री साईलीला''चा गेल्या महिन्याचा अंक वाचला. फारच स्फूर्तिदायक आहे. ''श्री साईलीला''ची अशीच प्रगती होत राहो, नि श्री साईकृपेने ''श्री साईलीला''चा उत्कर्ष हा असाच होत राहणार.

**- श्री. सु. ह. जोशी**
पुणे.

''श्री साईलीला'' मासिक म्हणजे श्री साईसत्चरितच वाटते. मे १९८९ च्या मासिकापासून ले. कर्नल श्री. मु. ब. निंबाळकर (निवृत्त) यांनी श्री साईसत्चरिताचा केलेला गद्य अनुवाद सुरू झाला आहे. त्यामुळे आम्हा अज्ञानी (ओवीबद्ध न समजणारे) भक्तगणांवर त्यांचे खूप उपकार झाले आहेत.

**- श्री. आर. बी. वाढीवकर**
बोरीवली (प.), मुंबई.

"श्री साईलीला"चा नोव्हेंबर-डिसेंबरचा "श्री साईबाबा भक्तस्वानुभव विशेषांक" सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचला. खूपच आवडला! लेखांची मांडणी समर्पक आहे. अंक केवळ वाचनीय, बोधप्रद नसून, त्याची रचनाही उत्कृष्ट आहे. "श्री साईलीला"ला माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्री. शंकर गोसावी**
जोगेश्वरी (प.), मुंबई.

"श्री साईलीला" हे मासिक वाचल्यावर मला आत्मिक समाधान मिळते. त्यातील गदय, पदय व अन्य लेखन वाचल्यावर श्री साईबाबांविषयीचा भक्तीचा होम अधिकाधिक सोन्यासम उजळून निघतो. अज्ञानमय जीवनात साईरुपी लख्ख प्रकाशाने मन, बुद्धी श्री साईचरणी लीन होते.

**- श्री. प्रविण बी. चंपानेरकर**
डहाणू, ठाणे.

"श्री साईलीला"चा अंक हाती पडताच तो मी मोठ्या उत्सुकतेने व तन्मयतेने सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचून काढतो. विशेषकरुन ऑक्टोबर १९८९ चा अंक वाचताना श्री बाबांचे चमत्कार व त्यांची वचने मनाला स्पर्श करुन गेली. प्रामुख्याने "जुन्यातलं सोनं" ह्या सदरातील श्री साई बोधामृत (अध्याय ३३) वाचताना बाबांनी सांगितलेले उपदेश खरोखरच अनुकरणीय असून त्याद्वारे मानव आपले जीवन पूर्णपणे बदलवून, स्वत:ला बाबांच्या चरणी अर्पू शकतो, हे निदर्शनास आले. ईश्वर सगळीकडे आहे; ईश्वर नाही, अशी एकही जागा नाही. श्री बाबांची कृपा व माया आपणा सर्वांबरोबर असो, ही त्या श्री साईचरणी प्रार्थना.

**- श्री. एस्. एस्. राणे**
माहिम, मुंबई.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३१-०० | ९-०० |
| २. | —"— | इंग्रजी | १२-५० | ६-५० |
| ३. | —"— | हिंदी | १६-७५ | — |
| ४. | —"— | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | —"— | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | —"— | तेलगु | १९-०० | ८-०० |
| ७. | —"— | तामीळ | — | — |
| ८. | —"— | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साईसत्चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | ९-०० | — |
| ११. | —"— | हिंदी | ११-०० | — |
| १२. | —"— | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ४-२५ | — |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | —"— | हिंदी | १-१५ | ३-५० |
| १६. | —"— | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | —"— | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | —"— | गुजराथी | ०-९५ | ३-५० |
| २०. | —"— | तेलगु | ३-५० | ५-५० |
| २१. | —"— | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ६-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | — |
| २५. | —"— | इंग्रजी | १-८५ | — |
| २६. | —"— | हिंदी | १-५० | — |
| २७. | —"— | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | —"— | तेलगु | २-०० | — |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १-१५ | ३-५० |
| ३०. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६-०० | ४-०० |
| ३१. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ४-५० | ४-०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-५० | ४-०० |
| ३३. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |
| ३४. | स्तवनमंजरी | इंग्रजी | १-१० | ३-५० |
| ३५. | शिरडी डायरी (खापर्डे) | इंग्रजी | ९-५० | ४-५० |

Licence to Post Without Prepaymen
at Dadar Head Office, Bombay-14
Regd.: No. MH/BYE/26
LICENCE No. 19

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४" x २०" | १.७५ | ५.५० |
| २. | –"– | पोष्टकार्ड | ०-२५ | "–" |
| ३. | –"– | २" x ३" | ०-१० | –"– |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १७" x २२" | २-८० | –"– |
| ५. | –" | १४" x २०" | १-७५ | –"– |
| ६. | –" | १०" x १४" | १-१५ | –"– |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १४" x २०" | १-७५ | –"– |
| ८. | –"– | १०" x १४" | १-१५ | –"– |
| ९. | –"– | ७" x १४" | ०-६० | –"– |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४" x २०" | १-७५ | –"– |
| ११. | –"– | १०" x १८" | १-१५ | –"– |
| १२. | –"– | ७" x १०" | ०-६० | –"– |
| १३. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०-२५ | –"– |
| १४. | पालखी (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०-२५ | –"– |
| १४. | पालखी (४ रंगात) | ७" x १०" | ०-६० | –"– |
| १५. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४" x २०" | १-४० | –"– |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :—**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर - ४२३ १०९.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.

मुद्रक : श्री. एम. डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक :** कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी, साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४.

फेब्रुवारी १९९०) (किंमत २ रु.

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



फेब्रुवारी १९९०

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक
कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी


श्री साईकाव्यबहार विशेषांक


वर्ष ६८ वे) किंमत २ रुपये (अंक ११ वा
दूरध्वनी ४१२२५६१

-: कार्यालय :-

साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/-
(ट.ख.सह)

तहहयात वर्गणी - ३०० रु.



श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे
हे श्री साईलीला मासिकाचे मुख्य उद्दिष्ट आहे.



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

९८

तुझे अंगीं देवा ममता हो भारी। आईहूनि थोरी दिसे मज॥
न्याय कृपादान सर्वां सम जाण। अंतरांत खूण ओळखावी॥
दृष्टि ही उदार दया पुत्रावरी। बाप जैसी करी तैसा गुरु॥
आणीक लक्षणें पहावीं तीं थोडीं॥ दासाचीं सांकडीं दुरावितो॥

९९

कां रे तूं उदास नको वाहू चिंता। ठेवी प्रसन्नता मनाची या॥
एकाद्या वस्तूसी जैसें शृंगारावें। स्वरुप पहावें गोड तिचें॥
मना अलंकार संग सज्जनांचा। सच्चित्स्वरुपाचा लाभ मिळे॥
दास ह्मणे पाप कशा उगळावें। चित्त वळवावें देवापायीं॥

१००

फुलांचा रंगारी उत्तम चितारी। नांदे सृष्टीवरी कोण बरें॥
नाना फळें पुष्पें नाना वनस्पती। तयांची उत्पत्ति केली कोणीं॥
गुण अवगुण रसास्वादशक्ति। ही सर्व संपत्ती जीवनार्थ॥
कोणासी सुगंध कोणासी दुर्गंध। कोणासी हो गंध मुळीं नसे॥
जांभूळ बाभूळ एका जमिनींत। एका उदकांत भिन्न स्वाद॥
दास ह्मणे देवा तुझीच करणी। नारळांत पाणी कैसें आलें॥

**या मासिकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | – श्री. चकोर आजगांवकर | ८ |
| २. | कृपा | – श्री. दत्तात्रय जोशी | १० |
| ३. | साईनाथा कृपा करा | – कु. संगीता पाटील | ११ |
| ४. | धन्य ती "साईनाथ" माऊली | – श्री. चंद्रशेखर वराडपांडे | ११ |
| ५. | जीव | – उज्ज्वला साठे | १२ |
| ६. | नमस्ते प्रणमामि त्वम् | – श्री. अनिरुद्ध वर्तक | १३ |
| ७. | उमटली प्रतिमा | – सौ. उषा मुळे | १३ |
| ८. | समर्पण | – श्री. अरुणकुमार वणवे | १४ |
| ९. | साईध्यास | – कु. सुरेखा पळ | १४ |
| १०. | प्रार्थना | – प्रा. श्री. आय्. पी. अुमराणी | १५ |
| ११. | गुरु साईनाथा | – सौ. सुनिता सकपाळ | १५ |
| १२. | लागला साई साई बोलायला... | – श्री. शिवाजी मोरे | १६ |
| १३. | साई माऊली आमुचे घरी | – कु. निकिता कोरडे | १६ |
| १४. | साई नारायणा | – श्री. उल्हास वाळुंजकर | १७ |
| १५. | साई माता, साई पिता, साई दाता | – श्रीमती विमल विदे | १८ |
| १६. | विश्वव्यापी | – श्री. सूर्यकांत परब | १९ |
| १७. | "श्री साई कवितारती" | – | २० |
| १८. | "साई प्रसाद" | – | २१ |
| १९. | मागणे | – सौ. कल्पना कोरडे | २१ |
| २०. | भक्त चव्हाण सांगे सर्व लोका | – श्री. डी. डी. चव्हाण | २२ |
| २१. | श्री साईलीला | – सौ. शकुंतलाबाई गोंदकर | २२ |
| २२. | साईसाथ | – श्री. आशिष हजारे | २४ |
| २३. | जीवनाचे सारसर्वस्व | – वैखरीताई | २५ |
| २४. | साईनाथ | – सुधा शिवलकर | २६ |
| २५. | साई राम नाम जप प्रभावाने | – श्री. एस्. एस्. कविलाक्षी गुरुजी | २७ |
| २६. | साईअष्टक | – सौ. वर्षा आठवले | २७ |
| २७. | साक्षात्-ईश्वर साई | – श्री. शाम जुवळे | २८ |
| २८. | श्री साईनाथांचा संदेश | – श्री. दिलीप सावंत | २९ |
| २९. | सर्वसाक्षी साई तू | – श्री. द. ग. तळेकर | ३० |
| ३०. | गोविंदा | – श्री. माधव पवार | ३१ |
| ३१. | शिरडीत कृष्ण आला | – श्री. विलास पडवळ | ३२ |
| ३२. | साई नाम | – श्री. राजेंद्र गवळी | ३२ |
| ३३. | हे साई! | – श्री. श्रीकांत सावंत | ३३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४. | चोहिकडे मज साईच भासे | – डॉ. विनायक दुर्गे | ३४ |
| ३५. | साईमाऊली | – श्री. दादासाहेब कोते | ३५ |
| ३६. | श्री साईमंत्रांजली | – श्री. मनोहर धुमाळ | ३५ |
| ३७. | साई गुरु जगाचा | – श्री. पां. रं. प्रधान | ३६ |
| ३८. | नाही तेल परि पाणी पेट घेत | – दा. र. दळवी | ३८ |
| ३९. | त्रिलोक सुंदर। साई-फकीर॥ | – श्री. बाळासाहेब नाडकर्णी | ३९ |
| ४०. | दिव्य जीवनाकडे | – श्री. चकोर आजगांवकर | ४० |
| ४१. | श्री साईनाथा | – श्री. दिलीप जोशी | ४३ |
| ४२. | चित्र मी काढू कसे? | – श्री. नारायण चिपळूणकर गुरुजी | ४३ |
| ४३. | साई नाम | – श्री. अशोक साळसकर | ४४ |
| ४४. | साई मंदीर | – श्री. आर. जी. पगारे | ४५ |
| ४५. | नमो साईनाथा | – श्री. विजय गुरव | ४६ |
| ४६. | साईनिवास | – प्रा. श्री. पी. के. धर्माधिकारी | ४६ |
| ४७. | साई जीवनाचा राजा | – प्र. गो. कुळकर्णी | ४७ |
| ४८. | मज साई हवा | – श्री. मुरलीधर घोलप | ४८ |
| ४९. | साईनाथ नमोस्तुते | – पं. श्री. वा. निगुडकर | ४९ |
| ५०. | योगीराज परब्रह्म | – श्री. सुरेश गोसावी | ५० |
| ५१. | आस | – सी. बी. खरे | ५१ |
| ५२. | साईने कृपा केली | – श्री. वि. म. हटवार | ५१ |
| ५३. | ॐ नमो भगवते श्री साईनाथाय् | – श्री. माधव निगळे | ५२ |
| ५४. | ईश्वरे वरदान। दिल्हे मज | – | ५३ |
| ५५. | आर्तसाद! | – सौ. मानसी केसकर | ५३ |
| ५६. | साई तुझी सोबत होती | – श्री. रमेश चव्हाण | ५४ |
| ५७. | साई महिमा | – सौ. भावना जेऊरकर | ५५ |
| ५८. | भाव-समर्पण-१ | – | ५६ |
| ५९. | याचना-२ | – श्री. संजय परळकर | ५६ |
| ६०. | साई-दर्शन | – सौ. मंदा इनामदार | ५७ |
| ६१. | श्री. माधवराव बळवंत (बाबांचा शाम्या) देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र | – | ५९ |
| ६२. | श्री साईंचे सत्य चरित्र, अध्याय ५ वा | – | ६२ |

# ''श्री साईलीला'' लेखक-कवींना निवेदन

## गद्य लेखन

''श्री साईलीला''कडे साहित्य पाठविताना ''श्री साईलीला'' लेखकांनी पुढील प्रकारात आपले लिखाण बसते का, याची दक्षता घ्यावी.

* दिवंगत संत महात्म्यांवर आधारित समयोचित लिखाण.
* श्री साईबाबांचे पूर्व व समकालीन संतांचे तत्त्वज्ञान, कार्यप्रणाली व श्री साईबाबांचे तत्त्वज्ञान, कार्यप्रणाली यांतील साम्य व भेद.
* श्री साईबाबांचे उपदेश आचरण करताना आलेले अनुभव.
* श्री साईबाबांचे उपदेश, बोल व घटना यांविषयी आपल्याला झालेले आकलन, उमगलेला विश्लेषणात्मक अर्थ.
* श्री साईबाबांच्या कृपाछायेचे अनुभव.
* श्री साईबाबांच्या जीवनावरील अन्य भाषेतील समर्पक लिखाणाचे अनुवाद. (मूळ लेखकाचा, पुस्तकाचा संदर्भ देणे आवश्यक)
* बालसाईभक्तांसाठी हलक्या-फुलक्या, सहज-सोप्या भाषेत आध्यात्मिक लिखाण.

## कवितालेखन

* कवींनी आपले दर्जेदार काव्यच ''श्री साईलीला''त प्रसिद्ध करण्यासाठी पाठवावे. वृत्त, ताल, छंद वा मुक्त छंद इत्यादी आकृतीबंधात न बसणाऱ्या कविता स्वीकारणे शक्य होणार नाही. यासाठी कवितांची रचना व आशय याकडे अधिक लक्ष पुरवावे.
* ''श्री साईलीला''करिता साहित्य लिहिताना कागदाच्या दोन्ही बाजूस पुरेसा समास सोडावा, दोन ओळींच्यामध्ये पुरेसे अंतर ठेवावे, कागद जीर्ण-विजीर्ण असू नये, आशय व्यक्त करताना तो मुद्देसूद व सलगपणे मांडावा.
* ''श्री साईलीला'' लेखक-कवींनी आपल्या काव्य व लेखाची एक प्रत स्वतःच्या रेकॉर्डसाठी स्वतःकडे ठेवणे आवश्यक आहे. प्रसिद्ध न झालेले साहित्य परत पाठविणे अशक्य आहे. तरी, त्यासंबंधीची विनंती कृपया करू नये.

* लेखक-कवींनी देण्यात येणाऱ्या सूचनांचा बारकाईने अभ्यास करावा. या सूचनांनुसार निवडलेले लेख, कविता, अनुभव यांचाच प्रसिद्धी करिता विचार केला जाईल.

—◆—

# "श्री साईलीला" सभासदांना निवेदन

* "श्री साईलीला" संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करताना "श्री साईलीला"च्या जुन्या सभासदांनी त्यांच्या "श्री साईलीला" सभासद क्रमांकाचा पत्रात उल्लेख करावा.

* "श्री साईलीला" वेष्टनावर वर्गणी केव्हा संपत असल्याचा महिना व वर्ष नमूद केलेले असते, त्याप्रमाणे वर्गणी संपण्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर आपली वर्गणी भरावी.

* पत्त्यात बदल झाल्यास शिरडी कार्यालयाला त्वरित कळवावे, पिनकोडसहित पूर्ण पत्ता लिहावा.

* आपल्या पत्त्यात काही दुरूस्ती सुचवायची असल्यास, पत्ता अपूर्ण लिहिला जात असल्यास त्याविषयी त्वरित शिरडी कार्यालयाच्या निदर्शनास आणावे.

* "श्री साईलीला" मासिकाचे नवीस सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, शिरडी, मुंबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४ बी, खोदादाद सर्कल जवळ, दादर, मुंबई-४०० ०१४. येथे प्रत्यक्ष/मनिऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो "श्री साईबाबा संस्थान शिरडी" या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. "संदेश के लिए स्थान" आणि "भेजनेवाले का नाम व पूरा पता" असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

* मनिऑर्डर-पत्रावर पत्ता लिहिताना वाचता येईल अशा स्पष्ट अक्षरांत लिहावा.

—◆—

# सभासदत्व

श्री साईबाबा संस्थान, शिरडी येथील प्रशासन योजनेच्या कलम ९ (३) अनुसार माननीय धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आपल्या दिनांक ८/१२/१९८९ च्या क्रमांक एल् ए/२९-८९/एम् आय् एस् सी/२४४६३/८९ आदेशानुसार निरनिराळ्या वर्गातील सभासदत्वाच्या वर्गणीचे सुधारित दर पुढीलप्रमाणे निश्चित केले आहेत.

| अ. नं. | सभासदाचा वर्ग | वर्गणीचे सुधारित दर |
|---|---|---|
| १. | आश्रयदाता सभासद | रु. १५००/- |
| २. | आजीव सभासद | रु. २५१/- |
| ३. | सामान्य सभासद | रु. ११/- (प्रतिवर्षी) |

सभासद होण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज शिरडी व मुंबई येथील संस्थानच्या कार्यालयांत उपलब्ध असून याचठिकाणी संपूर्ण भरलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. सर्व साईभक्तांनी कृपया वरील बदलाची नोंद घ्यावी.

शिरडी

दिनांक १८/१/१९९०


**- के. पं. क्षीरसागर**

कार्यकारी अधिकारी,

श्री साईबाबा संस्थान, शिरडी.

# श्री साईभक्त लेखक-कवींना अभिवादन

## संपादकीय



प्रिय साईभक्त लेखक-कवी मित्रांनो! साईबाबांच्या रुपाने जो एक दैवी प्रकाश आपल्या जीवनात अवतरला आहे, हे आमचे अहोभाग्य आहे. वर्षानुवर्षे हृदयात बाळगलेल्या उत्कट भावना व सखोल श्रद्धा यांच्या प्रकाशात आम्ही श्री साईबाबांवर प्रेम करतो, त्यांच्या गुणांचा अनुवाद करतो, त्यांची आराधना करतो, त्यांची स्तुतिस्तवने गातो. आम्ही बाबांची लेकरे आहोत, श्री साई परिवारातील आम्ही भाग्यशाली सदस्य आहोत. आम्ही इतरांहून वेगळे आगळे आहोत; कारण बाबांसारखा अंधाराच्या प्रकाशात, अज्ञानाच्या ज्ञानात, विनाशाच्या मृत्युंजय जीवनात रुपांतर करणारा परीसमणी आम्हाला आमच्या या सामान्य जीवनातही लाभला आहे. बाबा आमचे जिवलग मित्र, तत्त्वज्ञ उपदेशक व मार्गदर्शक वाटाडे आहेत. इतर क्षेत्रांतील नामवंत लेखक व कवी असंख्य आहेत. ते उत्तम लेखन-तंत्र जाणणारे, भाषेवर प्रभुत्व असलेले व प्रतिभेने ओसंडणारेही असतील. आम्ही साईभक्त तेवढे उत्तम जाणकार साहित्यिक नसूही! पण त्यांना बाबांच्या प्रेमाचे व कृपेचे निधान, जो भक्तीचा मौल्यवान ठेवा सापडलेला नाही, तो आम्हाला मात्र साईरुपाने सापडला आहे.

साईभक्तांची दरवर्षी स्वानुभव विशेषांक (नोव्हेंबर-डिसेंबर) व श्री साई काव्यबहार (फेब्रुवारी) विशेषांक याद्वारे वर्षातून एकवेळ मीलन-भेट होत असते व त्याद्वारे एकमेकांचे साईवाङ्मय व साईचळवळ यांतील अनुभव, विचार, प्रतिक्रिया यांची देवाण-घेवाण होत असते. दरवर्षी फेब्रुवारी अंक हा साईबाबांवरील कविता-लेखनाचा अंक म्हणून निघतो. ती प्रथा या अंकाद्वारे पाळली जात आहे व हा अंक श्री साईकाव्यबहार विशेषांक म्हणून निघत आहे. अर्थात, इतर नेहमीची सदरे आहेतच. लेखक-कवींना बाबांवरील उत्स्फूर्त लिखाणाची हा अंक एक वाहिनी आहे. यासाठी या अग्रलेखात आम्ही काव्य, संगीत, भक्ती, ज्ञान इत्यादींची चर्चा केल्यास ते वावगे ठरणार नाही. कविला निर्मितीक्षमता, स्फूर्ती आणि भावविचारांचा योग्य शब्दांत आविष्कार या गुणांची प्रामुख्याने आवश्यकता असते. धार्मिक व भक्तिपर वाङ्मयाचे सृजन करणाऱ्या लेखक-कवींत यांची अधिकच जरुरी आहे; कारण हे गुण दैवी असून देवाला आकर्षित करणारे आहेत. ईश्वर हाही एक सृजनशील कवी

असून सारे विश्व हे त्याचे महान काव्य सृजन आहे. ते त्याने आपल्या प्रतिभेतून पाहिले व निर्मितीकौशल्यातून साकारले. लेखक-कवींनी परमेश्वराच्या या प्रतिभेचे अनुकरण करावे. त्यासाठी त्याची भक्ती, त्याचे ज्ञान, त्याचा निदिध्यास हवा. सतत प्रेम, भक्ती, योग, ज्ञानाची साधनाही करावयास हवी. असे केल्याने लेखक-कवींना ईश्वराच्या विश्वरुपाशी, त्याच्या प्रकाश, सत्य व आनंद ह्या आविष्कारांशी योग्य असा संवाद साधता येईल.

थोर, प्रतिभावंत मराठी लेखक-कवींच्या तोडीचे उत्तम लेखक-कवी आम्ही साईभक्त लेखक-कवी एकवेळ नसूही. तेवढे भाषेवरील प्रावीण्य, प्रभुत्त्व व संपन्नता आम्ही मिळवू शकत नसू. परंतु आम्हामध्ये एक आगळी गोष्ट आहे, ती म्हणजे खऱ्या भक्तीचा स्फुल्लिंग! हृदयात खोलवर रुतलेला साईप्रेमाचा, परमेश्वरभक्तीचा भावबंध! जेव्हा जेव्हा आम्ही एकत्र जमतो, बोलतो, चालतो, तेव्हा तेव्हा आमच्या आठवणींना आम्ही तजेला देतो. बाबांच्या लीला आठवून सद्‌गदित, रोमांचित होतो. शिरडीचे पवित्र पाणी पिऊन आम्ही आमचे प्रेम व भक्ती यांना नवजीवन देतो. शिरडीच्या वातावरणात रेंगाळणारा बाबांच्या विभुतीमत्वाचा सुगंध आम्ही आकंठ पिऊन धुंद होतो. आमची मने नव्या अनुभवांनी संपन्न करतो व आमच्या व्यक्तिमत्त्वाला एक नवा आकार, एक नवी परिमिती देऊन त्याचा विकास व विस्तार घडवितो. मानवत्त्वाकडून माधवत्त्वाकडे नेणारा विश्वात्मक बंधुत्त्वाचा रस्ता शिरडीतून फुटतो. दु:खी मानवतेसाठी झटण्याचा व पददलितांना हाती धरण्याचा मार्ग बाबा आम्हाला दर्शवितात.

आम्हाला भगवंताच्या दोन थोर भक्तांचं अनुकरण शिरडीत शिकावयाचे असते. एक ज्ञानीभक्त अर्जुन व दुसरा प्रेमभक्त उद्धव! अर्जुन हा श्रीकृष्णांना प्राणप्रिय होता; कारण तो कर्तव्यदक्ष, सन्मार्गगामी, महान योद्धा होता. एवढेच नव्हे, तर तो विवेकी, आत्मसंशोधन करणारा व गुरुशरणवृत्तीचा होता. त्यामुळे कर्म, भक्तीशी ज्ञान, योगाची सांगड घालणारी गीता शिकविण्यास श्रीकृष्णांना तो पात्र वाटला. गीतेचा मार्ग समतोल, समर्थ, प्रभावी-जीवन जगण्यास शिकविणारा आहे; जीवन ही एक पूजा म्हणून परमेश्वराला समर्पण करण्याचा आहे. मन, बुद्धी, अहंकाराला प्रभूपदी वाहण्यास शिकविणारे ते एक प्रात्यक्षिकच आहे.

दुसरा भक्त उद्धव हा प्रभूच्या प्रेमात बुडालेला होता. इतका की त्याची तुलना गोपींच्या भक्तीशी करता येईल. कृष्णाला त्याचा एक क्षणभरही विरह सहन होत नव्हता. कृष्णाला देह विसर्जन करण्यापूर्वी उद्धवाला बदरीश्रमात तप करावयास पाठवावे लागले; कारण उद्धवाला प्रभूचे निर्गमन सहन झाले नसते; कृष्णालाही उद्धवाचा

विरह सोसविला नसता.

"श्री साईलीला"च्या लेखक, कवी, वाचकांनी या दोन थोर भक्तांचे आदर्श नजरेपुढे ठेवावे व त्याचे अनुकरण करावे. सध्या आम्ही जे लेखन करतो, ते उत्स्फूर्त प्रेमाचे उद्गार असतात. आम्ही लेखनाचे तंत्र व मंत्रही आत्मसात करावयास हवे. भगवंतांनी "योग: कर्मसु कौशलम्" असे म्हटले आहे, हे विसरु नये. आम्ही जे साहित्य निर्माण करतो, त्याच्या दर्जावर आपण आत्मसंतुष्ट रहाता कामा नये, तर अधिकाधिक उच्च पातळी गाठावयास हवी व वाङ्मयीन कलेची सर्व अंगे शिकावयास हवी. हा आमचा सल्ला आमच्या होतकरू, हौशी, नवशिक्या लेखक-कवींसाठी आहे. अभ्यासू, अनुभवी, कष्टाळू लेखक-कवींना उद्देशून नाही, हे उघड आहे.

**- चकोर आजगांवकर**
हंगामी कार्यकारी संपादक

—◆—

# कृपा

बसतो उठतो निजतो फिरतो कृपा तुझी साई
रूप तुझे मी विविधतेतुनि नटलेले पाही॥
संसाराचा दुस्तर सागर कर मजला पार
रक्षण माझे कर साई तू तुजवरती भार
जशी बुद्धी तू देशी मजला तसाच वागत राही॥
तू करुणेचा मेघ होऊनि दे ज्ञानामृत धार
तूच दयाळा दे मज शक्ती झेलाया वार
तूच करी मज सुसह्य जगणे चित्त तुझे ठायी॥
श्वासाश्वासातून मला रे तुझाच साक्षात्कार
तुला विसरुनी कृती कोणती वाटतसे अभिचार
दत्त दिगंबर माझा तू रे, तू वत्सल आओी॥

**- श्री. दत्तात्रय ज. जोशी**
सदाशिव पेठ, पुणे.

—◆—

# साईनाथा कृपा करा

संकटी तारा दया करा
साईनाथा कृपा करा॥

तारुनी देवा हाती धरा
आश्रय द्यावा त्वरा करा॥

अनुभव दावून या विश्वी
सुखविलात तुम्ही सर्व धरा॥

उद्धारून मज संसारी
प्रसाद द्यावा आज करा॥

शिरडी माझे तीर्थ खरे
उदी शिरावर वर्षी जरा॥

सस्मित प्रेमे दर्शन द्या
तृप्त मने परतेन घरा॥

- कु. संगीता ग. पाटील
भांडुप व्हिलेज (पू.), मुंबई.

—◆—

# धन्य ती ''साईनाथ'' माऊली

शिरडीला व्याघ्रा मुक्ती दिली
धन्य ती साईनाथ माऊली.....॥धृ॥

शिरडीत आला व्याघ्र प्रचंड
गळा तयाचे साखळदंड
बैल गाडीवरी उभा उदंड
दिसे भयंकर ती दंतावली.....॥१॥

व्यथा अंतरी त्या व्याघ्रासी
मालक त्याचे त्रय दरवेषी
आणिती बांधूनी त्या शिरडीसी
जाणूनी गुरुमाऊली.....॥२॥

पुच्छ उगारुनी करी गर्जना
अवचित पडला साईचरणा
पार निमाल्या सर्व वेदना
साईचरणी काया पडली.....॥३॥

- श्री. चंद्रशेखर व्यं. वराडपांडे
रेशीमबाग, नागपूर.

—◆—

## जीव

जन्ममृत्यूच्या भोवऱ्यामध्ये
जीव जाहला कष्टी
दीड वितीच्या पोटासाठी
स्वार्थाची प्रीती॥१॥

बहीण भाऊ नाती गोती
सुखकाळाला सर्व सोबती
संकटकाळी हात झटकती
नाही कोणी अंती॥२॥

भव सागरी या नांव सोडली
अर्ध्यावरती उपडी झाली
कांही तरले काही बुडाले
उरली मनि खंती॥३॥

दीनजनांचे दुःख जाणणें
सत्कर्मनि नित्य वर्तणे
सफल करावे इथले जगणे
यास्तव चरणी रती॥४॥

- उज्ज्वला बा. साठे
सदाशिव पेठ, पुणे.

—◆—

# नमस्ते प्रणमामि त्वम्

शांतचित्ता महाप्रज्ञा। साईनाथा दयाघना।
सर्व भूती स्वस्वरुपा। नमस्ते, प्रणमामि त्वम्॥१॥

दुःखत्रात्या कल्याणा। महासौख्या दयाघना।
तेजोनिधी कृपाळा हे। नमस्ते, प्रणमामि त्वम्॥२॥

सर्वेजन हिता धारा। सर्वेशा करुणालया।
कल्पवृक्षा मोक्षदात्या। नमस्ते, प्रणमामि त्वम्॥३॥

दीनबंधो महोदारा। दुःख, पीडा, निवारका।
शरणागत उद्धारा। नमस्ते, प्रणमामि त्वम्॥४॥

**- श्री. अनिरूद्ध वि. वर्तक**
मुलुंड (पू.), मुंबई.

—◆—

# उमटली प्रतिमा

साईंची प्रतिमा उदीतूनी आली
दत्तजन्मदिनी घरी प्रगटली॥१॥

आनंदाचे भरते मस्तक झुकले
निज भक्ता भेटी साईबाबा आले॥२॥

आपुल्या सेवेसाठी आशीर्वाद दयावा
लेखनामधून प्रकाश फुलावा॥३॥

प्रत्यक्ष देव तो मनी बोध घ्यावा
कर हा कृपेचा शिरावर ठेवा॥४॥

आपुल्या तत्त्वांचा अमोल हा ठेवा
जनात मनात नित्य जागवावा॥५॥

**- सौ. उषा प्र. मुळे**
पुणे.

—◆—

# समर्पण

तुजला पाहता धुंद झाले मन
झिजे पायावर तुझ्या माझे तन
तुझे नाम घेत जगावेसे वाटे
बंदा मी सेवक नेत्री जल दाटे
सात पावलांचा स्वर्ग उभारीला
तुजभवताली भ्रमर भ्रमला
तुजला पाहता मिळे सर्व काही
नको मानधन चित्त तुझे ठायी

- **श्री. अरुणकुमार वणवे**
माळीनगर, सोलापूर.

—◆—

# साईध्यास

साई मम माऊली। जगताची सावली
शिर्डी तव स्थान। असे वैभवशाली
पंकज उमले जरी। नित्य चिखलात
माझिया मनात। तुमचा नित्य ध्यास॥१॥

मन आतुरे आतुर। घ्याया साईंचे दर्शन
मूर्ती वसे हृदयात। परि अधीर लोचन
रत्न-सोने घेते जन्म। जरी मातीत धुळीत
एक माझ्या अंतरात। तुझा साईबाबा ध्यास॥२॥

तुझ्या भेटीसाठी देवा। ताटकळत मी उभी
पुष्प जीवनाचे भरी। साई नाथांच्या सौरभी
अधीर हे माझे मन। किती पहाशील अंत?
माझ्या जीवनात तुझा। नित्य साईनाथा ध्यास॥३॥

- **कु. सुरेखा गं. पळ**
माहिम, मुंबई.

—◆—

# प्रार्थना

साई काय सांगू, तुला आदरोनी ॥धृ॥

तुझी गोड येता, स्मृती आसवांनी
पहा नेत्र येतात, दोन्ही भरोनी ॥१॥

उदारा दयाळा, तुझ्या देणग्यांचा
सदा दिव्य वर्षाव, होई वरोनी ॥२॥

कृपेचा तुझ्या, गोड मेवा मिळाया
सुखे जन्म देई, मला रे फिरोनी ॥३॥

जसे नीर मीनास, तैसा मला तू
स्मृती नित्य तुझी, वसे मन्मनी ॥४॥

तुझे प्रेम राया, तुझी भक्ती छाया
सदा रोम रोमांत, राहो भरोनी ॥५॥

तुझे गीत ओठी, तुझे प्रेम पोटी
तुला हात जोडी, जगी या जगोनी ॥६॥

- प्रा. श्री. आय्. पी. अुमराणी
शाहूरोड, कोल्हापूर.

—◆—

# गुरु साईनाथा

आळवावे किती तुम्हा
साईनाथा दयाघना
शांतचित्ता महाप्रज्ञा
साईनाथा महामना
शिवाचा रुद्र अवतार
शोभसी तू जनार्दना
शरणागत आश्रया देवा
गुरु राजा महाजना
शिरडीग्राम निवासी तू

देशी सर्वत्र दर्शना
भक्त मानस हंसा तू
धावसी भक्त रक्षणा

- सौ. सुनिता सु. सकपाळ
माझगांव, मुंबई.

—◆—

## लागला साई साई बोलायला....

प्राणाहून प्रिय त्या शिर्डीस जातो
साईच्या भक्तीत तल्लीन होतो
काय सांगू तुम्हाला साईंची गोष्ट
माता ना पिता ना जात ही स्पष्ट
पाण्याने दीपक जाळले
अखंड तेवत ठेवला अग्नी
देवाच्या देवाने मागितली भिक्षा
तरीही भक्तांची केलीच रक्षा
साईला बोलवा भक्तीने भावे
साई समाधीतूनी मदतीला धावे
सबका मालिक सांगे हा एक
श्रद्धा नि सबुरी ठेवा हो नेक
सर्वांचे दैवत माझा हा साई
माझ्याकडे प्रेमभरे सदैव पाही

- श्री. शिवाजी कौ. मोरे
शिंदखेडा, धुळे.

—◆—

## साई माऊली आमुचे घरी

आमुचे घरी साई माऊली
आली आली रे दिवाळी आली

आमुचे घरी साई माऊली
चणे फुटाणे खडीसाखर
प्रसाद देऊनी गेली
आली आली रे दिवाळी आली
आमुचे घरी साई माऊली॥१॥

भगवे कपडे लेवुनी आली
आशीर्वाद आम्हां देऊन गेली
आली आली रे दिवाळी आली
आमुचे घरी साई माऊली॥२॥

शिरडीचा राजा परमेश्वर मोठा
नाही त्याच्या भक्तांना तोटा
आली आली रे दिवाळी आली
आमुचे घरी साई माऊली॥३॥

नमस्कार करिते छोटा
बाबा मानून घ्या तो मोठा
आली आली रे दिवाळी आली
आमुचे घरी साई माऊली॥४॥

– कु. निकिता मि. कोरडे
गिरगांव, मुंबई.

—◆—

# साई नारायणा

पाव ना आम्हास। साई नारायणा।
कोण गरीबाला। दाता तुझ्याविना॥१॥

तूच पामराचा।निवारा आहेस ।
भक्ताची लावावी। नाव किनाऱ्यास॥२॥

पोथी अमृताची। तुझी वाचतो मी।
लागते मनाला। रुची तुझ्या नामी॥३॥

ओळखसी देवा। मनीच्या भावना।

पाव ना आम्हास। साई नारायणा।।४।।

जन्म लाभला ही। तुझी कृपा देवा।
वेडीवाकुडी मी। करी तुझी सेवा।।५।।

रूप दिव्य तुझे। दाखवी मन्मना।
ऋणी मी राहीन। तुझी नारायणा।।६।।

भक्त जाहले रे। लीन तुझ्या ध्यानी।
दास गणु गातो। तुझी प्रेम गाणी।।७।

व्यर्थ दौलतीची। मज हाव नसे।
तूच एक धन। साई नारायणा।।८।।

**- श्री. उल्हास अ. वाळुंजकर**
शिरडी, कोपरगांव.

—◆—

# साई माता, साई पिता, साई दाता

निज भक्तांच्या कल्याणा तू शिर्डीस अवतरशी
श्रद्धा, सबुरी मंत्र देवूनी जगास सुखविसी
प्रसादरुपी विभुती देवुनी दुःख निवारिसी
क्षणोक्षणी तू लाघव दावुनी सन्मार्गी लाविसी
साई साई स्मरता अविरत भवभय हरविसी
नेत्रीची निज ज्योत जाळूनी हृदया फुलविसी

**- श्रीमती विमल द. विदे**
वसई, ठाणे.

—◆—

# विश्वव्यापी

आलो दारी तुझिया साई
पावन अपुले दर्शन देई॥धृ॥

मालिक सबका विश्वव्यापी तू
राव रंकही समान तुजला
पावन अपुले दर्शन देई॥१॥

हीन दीन मी आलो पायी
आश्रय मजला चरणी देई
पावन दर्शन द्यावे साई॥२॥

तुझ्याविण ना कुणी मज वाली
तुझ्याविण रे नसे साऊली
पावन अपुले दर्शन देई॥३॥

- श्री. सूर्यकांत द. परब
ताडदेव, मुंबई.

श्रीकृष्णानी ज्ञान, कर्म, योगाभ्यास आणि भक्ती यांचे परस्परसंबंध पहिल्या ९ अध्यायात अर्जुनाला शिकविले. १० व ११ व्या अध्यायात स्वत:च्या विभूती सांगितल्या. विश्वविराट स्वरुप दाखविले. १२ व्या अध्यायात सर्व मार्गाचा समन्वय केला. त्यानंतर भगवान अर्जुनाला म्हणाले :-

''माझे दिव्यरुप पाहिलेस. आता तू मत्परायण हो. मला भज. माझ्या मायेचे लीला-क्षेत्र म्हणजे हा देह आहे. मी क्षेत्रज्ञ परमात्मा आहे. त्रिगुणात्मक मायेच्या क्षेत्राला ओलांडून मला क्षेत्रज्ञाला तू जाण. मी तुला माझी माया पार करावयाची शक्ती देईन. माझी भक्ती, समर्पित कर्मे व ज्ञानदृष्टी याद्वारे तू माझी माया तर. संसार हा उलटा वृक्ष आहे ; वर मूळ, तर खाली त्रिगुणाच्या पंचभूतांच्या फांद्यांचे गुंतागुंतीचे जाळे. त्या वृक्षाला तू माझ्या. कृपेतून मिळणाऱ्या ज्ञानाच्या शस्त्राने छेदून स्वत: ''पुरुषोत्तम'' हो.

– गीता

# ''श्री साई कवितारती''

श्री. रमेश चव्हाण व त्यांचे सुपुत्र बिपीन चव्हाण हे नवापूर (धुळे) येथून ''श्रीसाईकवितारती'' हे साईसाहित्याला वाहिलेले मासिक प्रसिद्ध करीत असतात. श्री. चव्हाण यांची शुद्ध साईभक्ती व काव्यप्रीति ही सुविख्यात आहे. साईभक्त लेखक-कवींचा लोकसंग्रह साधीत त्यांनी साईप्रेमाचा हा स्थंडिल कष्ट व आर्थिक झीज सोसून निष्ठेने प्रज्वलित ठेवलेला आहे, याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. त्यांना या कामात श्री. मुकुंद निकम, डॉ. इंदूताई नाईक, डॉ. सुमनताई खानविलकर, श्री. जगदीश देवपूरकर, श्री.वसंत साने यांचे मोलाचे सहाय्य व गुरुमाऊली दीदी यांचा शुभाशीर्वाद लाभला आहे.

''श्री साईकवितारती'' चा दिवाळी अंक हा आकर्षक स्वरुपात निघाला असून मुख्यत: तो काव्याला वाहिलेला आहे. सुरुवातीसच गुरुमाऊली यांची अमृतवाणी आहे. कविताश्रेयनामावलीत श्री. रमेश चव्हाण, श्री. जगदीश देवपूरकर, डॉ. इंदूताई, डॉ. सुमनताई, श्री. विजय चव्हाण, श्री. नागेश मोगलाईकर, नीता जाधव इत्यादी परिचित मानकरी असून ''श्री साईलीला''चे हंगामी कार्यकारी संपादक श्री. चकोर आजगांवकर यांचा ''साईबाबा व धुळे कोर्ट'' हा खास लेख व श्री. सुरेश गोसावी व श्री. भानुदास चव्हाण यांचे अनुक्रमे साईनाम व स्वानुभवावर खास लेख आहेत. यामुळे हा दिवाळी अंक वाचनीय झाला आहे. संस्थापक श्री. रमेश चव्हाण, श्री. बिपीन चव्हाण व संपादक श्री. मुकुंद निकम यांना धन्यवाद!

श्री साईभक्त लेखक-कवींनी आपल्या साहित्याच्या आशयाबरोबरच रचना व मांडणीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. रचनेचा खास अभ्यास केल्यावाचून लिहू नये व संपादकाकडे परिष्करण केल्यावाचून लिखाण पाठवू नये, हे पथ्य प्रत्येक लहान मोठ्या लेखक-कवींनी पाळल्यास साईसाहित्य अधिकाधिक संपन्न होईल. ''श्रीसाईकवितारती''चा दर्जेदार काव्य-लेखन देण्याचा प्रयत्न हा सर्वांच्या प्रेमाने व सहकार्याने यशस्वी होवो व साईभक्त श्री. रमेश चव्हाण यांचे ध्येयवादी स्वप्न आर्थिक दृष्ट्याही सफल होवो, ही साईचरणी प्रार्थना.

—◆—

# ''साईप्रसाद''

दरवर्षाप्रमाणे १९८९ मध्येही ''साईप्रसाद'' दिवाळी अंक प्रसिद्ध झाला. आमचे संपादकमित्र श्री. विजय हजारे यांची साईभक्ती व त्यांनी केलेल्या लोकसंग्रहातील साईभक्तांचे अनुभव व लेख यांनी हा अंक नटलेला आहे. अनुभवात्मक लेख हा साईभक्तांचा एक आवडता लेखन-प्रकार व साईभक्तीच्या कविता या अंकात प्रामुख्याने दृष्टीला पडतात. ले. क. श्री. मु. ब. निंबाळकर (निवृत्त), सरोजिनी मुळ्ये, आबानंद महाराज, डॉ. सुमनताई खानविलकर, डॉ. इंदूताई नाईक, श्री. शंकरराव चौबळ, श्री. सदानंद चेंदवणकर, मुग्धा जेऊरकर, श्री. मधुकर अंबाडे, श्री. शंकरराव सारंगधर, श्री. विश्वास खेर, श्री. प्रभाकर कोळमकर, श्री. आशीष हजारे इत्यादी भक्त लेखकांचीही या अंकात हजेरी आहे. साईभक्तांच्या श्रद्धेत भर पाडणारे भक्ती व श्रद्धायुक्त साहित्य वाचकांना देण्याचा संपादकीय विभागातील साईभक्त मंडळीचा प्रयत्न प्रशंसनीय आहे.

—◆—

# मागणे

तूच माझा प्रभू, तूच माझा साई
तूच माझा आत्मा, तूच माझा देह
न्याहळता शिरडी गांव, दिसे तेथे पंढरपूर
दिव्य उदीचा महिमा, प्रेम कृपेचे भांडार
भाग्यवान थोर पाय, लागतात द्वारकेस
गुरुस्थान निंबवृक्ष, समाधीचा मनी ध्यास
भक्ती तुझी साई राजा, माझ्या हाती घडूं दे रे
जीवन हे सार्थ व्हावे, अंती गोड होऊ दे रे

- सौ. कल्पना मं. कोरडे
गिरगांव, मुंबई.

—◆—

# भक्त चव्हाण सांगे सर्व लोका

दर्शनोत्सुक झाली साईंची लेकरे
पुष्पमाळ घालती घेऊनिया करे
हासरी प्रसन्न पाहूनी श्रीमूर्ती
श्री साई श्री साई हा नामघोष करिती॥१॥

घेऊनिया करी पूजेचे तबक
समाधीवरती ठेविती मस्तक
भक्तीभावे करा साईंचे स्मरण
अनन्य भावे-जावे त्या शरण॥२॥

श्रद्धेने लावावी उदी दिव्य भाळी
भक्तांचे रक्षण करी, आपत्काळी
भक्त चव्हाण सांगे सर्व लोका
साई नाम जप अखंडीत घोका॥३॥

**– श्री. डी. डी. चव्हाण**
तासगांव, सांगली.

— ◆ —

# श्री साईलीला

श्री साई माऊलीचे शिरडी स्थान महान
नेम एक अमुचा करु बाबांचे रूपध्यान
देव साईनाथ कुण्या माऊलीचा हिरा
शिरडी गांवाला लाविला मोत्याचा तुरा॥

देव साईनाथ कोंदणात जडला हिरा
भाविक भक्तांनो बाबांची सेवा करा
देव साईनाथ कुण्या माऊलीला झाला
लगीन वरातीतून शिरडीसी आला॥

देव साईनाथ कुण्या माऊलीचं बाळं
म्हाळसापतींनी जाणिली अंतरीची माळ
गंगागीर सांगे शिरडीसी आला हिरा
बंधुभगिनींनों तुम्ही तयाची पारख करा॥